**अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२५**

**निशाणी क्र. २९**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडकी** **सरकारी अभियोक्ता**

**..वि..**

**प्रकाश नथ्थुजी देहारकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ३** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | चेतन नारायण खंडाळकर |
| वय अंदाजे २४ वर्षे | धंदा– खाजगी इलेक्ट्रीशियन |
| राहणार | गोटमार बोरी, ता. मारेगाव, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये माझे शिक्षण चालू होते तसेच मी खाजगी व्यक्तीचे इलेक्ट्रीक फिटींगचे काम करत होतो. दिनांक १५/११/२०२३ रोजी मला जाधव साहेबांचा फोन आला होता की पिंप्रि येथे विज चोरी झालेली असून त्याबाबत सोबत चल. आम्ही आरोपी प्रकाश देहारकरच्या शेतामध्ये गेला. त्यानंतर जाधव साहेबांनी ऑपरेटरला फोन करुन विद्युत पुरवठा बंद करण्याबाबत सांगीतले. त्यानंतर मी आरोपीच्या शेतामध्ये असलेल्या विद्युत खांबावर चढलो व तेथील केबल काढले. त्यानंतर तेथे आरोपी व त्याचे वडिल आले. तेथे गिरी साहेबांमध्ये व आरोपीमध्ये दोन–दोन गोष्टी झाल्या, म्हणजे बाचाबाची झाली. आरोपीने गिरी साहेबांना म्हटले की ''आमचे केबल कसे तोडले''. त्यानंतर आरोपीने केबलने गिरी साहेबांना मारले. त्यानंतर मी माझ्या घराकडे निघून गेलो. मी आरोपी प्रकाश देहारकर याला ओळखतो व तो आज न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. डी. सोनटक्के यांचे मार्फत सुरु –</u>**

२. मी मुळचा मारेगाव तालुक्यातील रहिवासी आहे. माझा राळेगाव तालुक्याशी काहीही संबंध नाही. मला जाधव साहेबांचे पूर्ण नाव माहिती नाही. तसेच मला जाधव साहेबांचा मोबाईल नंबर माहित नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की त्यांचा नंबर माझ्या

मोबाईलमध्ये आहे. मी आरोपी प्रकाशला ओळखत नव्हतो. आरोपी प्रकाशच्या शेताचा गट नंबर व सर्व्हे नंबर मला माहित नाही. दिनांक १५/११/२०२३ नंतर माझा व पोलीसांचा काहीही संबंध आला नाही.

३. माझे शिक्षण बि.ए. पर्यंत झालेले आहे. बि.ए. च्या अभ्यासक्रमामध्ये इलेक्ट्रीक फिटींगचा अभ्यासक्रम नव्हता. मी पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले नव्हते की जाधव साहेबांनी मला फोन केला तसेच ऑपरेटरला फोन केला. हे म्हणणे खरे आहे की माझे जाधव साहेबांसोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की जाधव साहेबांनी मला कोर्टात काय सांगावयाचे आहे, ते मला सांगीतले व त्यानूसार मी न्यायालयात पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमोर कोणतीही घटना घडली नाही व मी घटनास्थळी गेलो नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की "*मला जाधव साहेबांचा फोन आला होता की पिंप्रि येथे विज चोरी झालेली असून त्याबाबत सोबत चल, आम्ही आरोपी प्रकाश देहारकरच्या शेतामध्ये गेला, त्यानंतर जाधव साहेबांनी ऑपरेटरला फोन करुन विद्युत पुरवठा बंद करण्याबाबत सांगीतले, त्यानंतर मी आरोपीच्या शेतामध्ये असलेल्या विद्युत खांबावर चढलो व तेथील केबल काढले, त्यानंतर तेथे आरोपी व त्याचे वडिल आले, तेथे गिरी साहेबांमध्ये व आरोपीमध्ये दोन–दोन गोष्टी झाल्या, म्हणजे बाचाबाची झाली, आरोपीने गिरी साहेबांना म्हटले की ''आमचे केबल कसे तोडले'', त्यानंतर आरोपीने केबलने गिरी साहेबांना मारले, त्यानंतर मी माझ्या घराकडे निघून गेलो*''. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी–काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – २०/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.